पुढारी



**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. विजय ककडे. सोबत डॉ. सुजाता पाटील, प्राचार्य डॉ. आर.पी.लोखंडे, प्रा. संजय ओमासे आदी.**

# विद्यार्थीदशेपासूनच वेळ, पैशाचे नियोजन आवश्यक : डॉ. ककडे

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांना जीवनात सर्वच आघाड्यांवर यशस्वी व्हायचे असेल तर वेळ आणि पैशाचे काटेकोर नियोजन आवश्यक असल्याचे मत डॉ. विजय ककडे यांनी व्यक्त केले. महावीर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजीत कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. पी.लोखंडे होते. डॉ. ककडे म्हणाले, आर्थीक साक्षरता आणि गुंतवणूकीबाबत विद्यार्थीदशेपासूनच सजग राहिल्यास येणारी आव्हाने पेलेणे शक्य होते. प्रास्ताविक डॉ.सुजाता पाटील यांनी केले. त्यांनी अर्थशास्त्र विभागामार्फत सुरू असणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. स्वागत प्रा. संजय ओमासे यांनी केले. यावेळी डॉ. मायगोंडा, प्रा. विजय पोवार, प्रा.अवधूत कांबळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. आभार ओंकार जाधव यांनी

# मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स येथील मराठी विभागाच्या वतीने दि. १० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर असा एक महिन्याचा मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त या कोर्समध्ये मोडीलिपीचे वाचन व लेखन यांचे प्रशिक्षण सायंकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे.

प्रवेशासाठी दहावी उत्तीर्ण असावे. इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले आहे. शासकीय व निमशासकीय कामासाठी, जातीच्या दाखल्यासाठी, न्यायालयीन कामकाजासाठी, महसूल कागदपत्रांसाठी तसेच संशोधनासाठी मोडी कागदपत्रे वाचणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असल्याने करिअर व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.